ज्ञानगंगा घरोघरी

सर्वोत्तम संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-४२२२२२

दूरध्वनी : ०२५३-२२३१४७३, २२३१४७९ फॅक्स :२२३१७१६

संकेतस्थळ : http://ycmou.digitaluniversity.ac e-mail : coe@ycmou.digitaluniversity.ac

जा.क्र.पनिका 2016 दि.11.2.2016

प्रति,
मा.केंद्रप्रमुख/केंद्रसंयोजक
य.च.म.मुक्त विद्यापीठाचे सर्व अभ्यासकेंद्रे

विषय :- लेखी परीक्षा मे-जून 2016 च्या बदललेल्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूपाबाबत...

महोदय/महोदया,

वरील विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, सोबत जोडलेले प्रसिद्धीपत्रक व लेखी परीक्षा मे-जून 2016 च्या बदललेले प्रश्नपत्रिकेचे स्वरूपानुसार अत्यंत तातडीने खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

1. सोबत जोडलेले प्रसिध्दीपत्रक आणि प्रश्नपत्रिका स्वरूपाचा नमूना विद्यार्थी, समंत्रक व इतर सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.
2. सोबत जोडलेले प्रसिध्दीपत्रक व प्रश्नपत्रिका स्वरूपाच्या नमुन्याचे ए-3 साईजमध्ये फ्लेक्स प्रिंटींग करून आपल्या अभ्यासकेंद्राच्या सूचना फलक, कार्यालय तसेच जेथे विद्यार्थ्यांच्या निदर्शनास येईल अशा ठिकाणी लावण्यात यावे.
3. आपणास पाठविलेल्या कॉपीचा ई-मेल सर्व विद्यार्थ्यांना करण्यात यावा.
4. सर्व विद्यार्थ्यांना व्हॉटस् अपवर पाठवावा.
5. सर्व विद्यार्थ्यांपर्यंत परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचा बदललेला नमुना वेळेत माहित करून देणे ही सर्वस्वी जबाबदारी अभ्यासकेंद्राची राहील.
6. सदर फ्लेक्स / पेपर प्रिंटीगसाठी येणारा खर्च आपल्या अभ्यासकेंद्राच्या खर्चातून करण्यात यावा.

उपरोक्त कामे तातडीने करण्यात यावी, ही विनंती.

परीक्षा नियंत्रक

प्रत :

1. **मा. कुलगुरू — माहितीसाठी.**
2. **मा. कुलसचिव — माहितीसाठी**
3. **सर्व विद्याशाखा/विभाग संचालक — माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी**
4. **सर्व विभागीय संचालक — त्वरीत कार्यवाहीसाठी.**
5. **मा. संचालक, मूल्यमापन विभाग — त्वरीत कार्यवाहीसाठी.**

सर्वोत्तम संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-४२२२२२

दूरध्वनी : ०२५३-२२३१४७३, २२३१४७९ फॅक्स :२२३१७१६

ज्ञानगंगा घरोघरी

संकेतस्थळ : http://ycmou.digitaluniversity.ac e-mail : coe@ycmou.digitaluniversity.ac

दि.11.2.2016

प्रसिद्धी पत्रक

लेखी परीक्षा मे-जून 2016 च्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप

विद्यापीठ राबवित असलेल्या विविध शिक्षणक्रमांसाठीच्या अभ्यासक्रमांची रचना, परीक्षा पध्दत, गुणविभागणी ही वेगवेगळ्या स्वरूपाची असल्यामुळे, दरवर्षी परीक्षा आयोजन करतांना मोठ्या प्रमाणात अडचणी येतात. तसेच महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या श्री. राजेश अग्रवाल परीक्षा सुधार समितीने परीक्षा पध्दतीत सुधारणा करण्यासाठी, प्रश्नपत्रिका ऑनलाईन पध्दतीने परीक्षा केंद्रावर पाठवाव्यात, उत्तरपुस्तिकांचे मूल्यमापन डिजीटल पध्दतीने करण्यात यावे, सर्व शिक्षणक्रमांचे निकाल 30 ते 45 दिवसांत जाहीर करणे अशा गोष्टी बंधनकारक केल्या आहेत. यासाठी लागणारी संगणक प्रणाली तयार करत असतांना प्रत्येक अभ्यासक्रमांची संरचना वेगवेगळी करावी लागत असल्याने, प्रश्नपत्रिकेचे स्वरूप एकसारखे असणे गरजेचे आहे त्यानुसार विद्यापीठाच्या परीक्षा मंडळ व विद्वत परिषदेने खास बाब म्हणून मान्यता दिल्याप्रमाणे मे-जून 2016 पासून सर्व विद्याशाखा व विभागाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्व शिक्षणक्रमांच्या प्रश्नपत्रिकांचे स्वरूप बदलून ते एकसारखे करण्यात येत आहे.

विद्यापीठाला विशेष बाब म्हणून नियमांमध्ये बदल करण्याचा अधिकार आहे. ही बाब प्रवेश प्रक्रियेतील " विद्यार्थी/उमेदवार करार" मध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आलेली आहे.

प्रश्नपत्रिका स्वरूप — विद्यापीठातील विद्याशाखा/विभागाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्व शिक्षणक्रमांसाठी मार्च 2016 पासून लेखी परीक्षेसाठी 80 गुणांची प्रश्नपत्रिका तयार करण्यात येईल यामध्ये 4 मुख्य प्रश्न असून प्रत्येक मुख्य प्रश्नांत पाच उप प्रश्न दिले जातील. विद्यार्थ्यांनी पाच उप प्रश्नांपैकी कोणतेही चार उपप्रश्न सोडवणे आवश्यक आहे. याप्रमाणे 1 श्रेयांकासाठी 20 गुण, 2 श्रेयांकासाठी 40 गुण व 3 ते 4 श्रेयांकासाठी 80 गुण याप्रमाणे 80 गुणांची प्रश्नपत्रिका राहील. अंतिम लेखी परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका 80 गुणांची असल्यास विद्याशाखा/विभागाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमांच्या संरचनेतील गुणांचे प्रमाणिकरण करण्यात येईल.

विद्यार्थ्यांनी सन 2015-16 च्या माहितीपुस्तिकांमधील प्रश्नपत्रिकेचे स्वरूप लक्षात घेऊ नये. तसेच विद्यापीठाच्या विविध मंडळाने खास बाब म्हणून मान्यता दिलेल्या सोबतच्या प्रश्नपत्रिकेच्या स्वरूपाचे अवलोकन करावे.

परीक्षा नियंत्रक

सोबत- लेखी परीक्षा मे-जून 2016 च्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप

लेखी परीक्षा मे-जून 2016 च्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप

YASHWANTRAO ज्ञानगंगा घरोघरी NASHIK - 422 222.

वेळ : ३ तास गुण : ८०

सर्वसाधारण सूचना :

१. सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
२. प्रत्येक उप-प्रश्न पाच गुणांचा आहे.
३. प्रत्येक उप-प्रश्नांचे उत्तर ७५ ते १०० शब्दात लिहा.
४. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे. उत्तर लिहितांना प्रश्न व उपप्रश्नाचे स्पष्ट उल्लेख करावे.
५. ८० गुणांच्या मुल्यमापनाचे आपल्या शिक्षणक्रमाच्या संरचनेनुसार गुणांचे आवश्यकतेनुसार रूपांतरण (Conversion) केले जाईल.

१. खालीलपैकी कोणतेही **चार** उपप्रश्न सोडवा.

अ) _____

ब) _____

क) _____

ड) _____

ई) _____

२. खालीलपैकी कोणतेही **चार** उपप्रश्न सोडवा.

अ) _____

ब) _____

क) _____

ड) _____

ई) _____

३. खालीलपैकी कोणतेही **चार** उपप्रश्न सोडवा.

अ) _____

ब) _____

क) _____

ड) _____

ई) _____

४. खालीलपैकी कोणतेही **चार** उपप्रश्न सोडवा.

अ) _____

ब) _____

क) _____

ड) _____

ई) _____

*****